MHSO060000062024

विशेष दिवाणी दावा क्र. ०१/२०२४
शितल शहा वगैरे
**वि**
सिमा जाधव वगैरे
CNRNo.MHSO060000062024

## निशाणी २१ वरील आदेश
(दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५ रोजी पारीत)

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ अन्वये वादी यांचेविरुद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. ज्या मिळकतीबाबत प्रतिवादीने प्रस्तुत अर्जातून वादीविरूध्द दाद मागितलेली आहे, ती मिळकती म्हणजे डि. सोलापूर सब डि. व ता. पंढरपूर पैकी खुद्द शहर पंढरपूर मधील टाकळीरोड येथील भुमापन क्र. ८४/६/क क्षेत्र ०हे ३०आर पैकी ०हे ०२आर ही मिळकत अर्जात नमूद केलेल्या चतु:सीमेसह दाव्याचा वाद विषय आहे. तसेच डि. सोलापूर सब डि. ता. पंढरपूर पैकी मौजे कासेगाव ता. पंढरपूर येथील गट नं. ८५/२/अ मधील शांग्रीला रेसीडंसी मधील सदनीका नं. ३०१ ज्याचे चटई क्षेत्र ५६ चौ.मी येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यामधील असलेले बांधकामासह तसेच विद्युत कनेक्शन, नळ नकेक्शनसह आतील सर्व तदंगभूत वस्तु व हक्कासह प्रतिदावा मिळकत २म्हणून समाविष्ट केलेली आहे. प्रतिवादी असे कथन करते की प्रतिदावा कलम १ मधील मिळकत ही प्रतिवादी क्रं.१ हीने स्वता: बांधलेली आहे तर प्रतिदावा मिळकत २ ही यांच्या माहेरकडील आलेल्या पैशातून स्वतंत्ररित्या खरेदी घेतलेली आहेत. त्यामुळे सदर मिळकत ही प्रतिवादी क्र. १ यांची

स्वतंत्र मालकी हक्क कब्जे वहिवाटीच्या मिळकती होत्या व आहेत. सदर मिळकतीशी यातील मुळ वादी यांचा कसलाही हक्क हितसंबंध नव्हता व नाही.

०३. आपल्या अर्जात प्रतिवादीने असे कळविले आहे की, दावा कलम १अ मधील मिळकत ही सुरूवातीला मोकळा प्लॉट शितल व शिला यांचे नावे खरेदी केला असला तरी त्यामध्ये प्रतिवादीची कब्जे वहिवाट होती व आहे. सदर मिळकतीत प्रतिवादीने स्वखर्चातून बांधकाम करून तेथे स्वत: राहत आहेत. तसेच उर्वरित जागेत भाडेकरू ठेवून भाडे वसूल करीत आहेत. सन २००४ मध्ये मुळ वादी क्र. १ ची प्रतिवादी क्र. १ शी ओळख झाली. पुढे त्याचे प्रेमात रूपांतर झाले. त्यानंतर दोघेही गंधर्व पध्दतीने विवाह करून नवरा बायको असे नाते संबंध निर्माण झाले व अद्यापही आहे. परंतु दोघेही पहिल्या नावावरच राहणेचे ठवले आहे. या संबंधातून त्यांना एक मुलगी झाली, मात्र तिचा खून मूळ वादींनी केला व ते प्रकरण दडपून टाकले.

०४. प्रतिवादी पुढे असे कळवितात की, सुरूवातीला प्रतिवादी क्र. १ ला मुळ वादी क्र. १ ने ७ ते ८ वर्षे इसबावी येथे भाडयाने राहून संबंध ठेवले. त्यानंतर दोन वर्षे पोरे यांचे घरात तर दोन वर्षे क्षीरसागर यांच मनिषानगर येथील घरात तर पुढील तीन वर्षे राउत यांचे घरी हरीनयन पार्क येथे तर दिड वर्षे शिंदे यांच्या घरी भाडयाने मुळ वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ नवरा बायको म्हणून संसार केला आहे. म्हणून प्रतिवादीची कायम स्वरूपी राहण्याची व उत्पन्नाची सोय व्हावी म्हणून प्रतिवादी क्र. १ हिने तिचे माहेरकडून घेतलेल्या पैशातून दावा मिळकत १अ मोकळा प्लॉट खरेदी घेवून त्यावर बांधकाम केले. तेव्हा पासून प्रतिवादी तेथे मालकी हक्काने रहात आहेत. खरेदी मात्र मुळ वादी यांचे नावे फसवून केली आहे. तसेच बाकी काही भाडेकरूंचे मिळणा–या भाडयातून तसेच तेथे प्रतिवादी आपला छोटा मोठा व्यवसाय

करून उपजिविका करत आहे. सदर दावा कलम १ब मधील मिळकत ही प्रतिवादी क्र. १ हिचे स्वतंत्र खरेदी मालकी हक्क कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. तसेच सदर मिळकतीमधील असणारे लाईटबिल, नगरपालिका कर इ. हिच भरत आहे. तसेच प्रतिवादींचे सर्व कागदपत्रे दावा मिळकत पत्यावरीलच आहे.

०५. प्रतिवादी पुढे असे कळवितात की, मुळ वादी क्र. १ चे आचार विचार मध्ये फरक पडला व प्रतिवादीची हेटाळणी करून तिला मानसिक व शारीरिक छळ करू लागला व दोन्ही दावा मितीळकती आबळस करणेचा प्रयत्न करू लागला. त्यातून मुळ वादींनी वकीलामार्फत खोटया मजकूराची नोटीस पाठवून दावा मिळकतीची मागणी केली व जिवीतास इजा करून घातपाताने खलास करतो अशी धमकी देत आहे. मुळ वादी हे पैसा, सत्ता मनुष्यबळ अनुकूल असणारे इसम आहेत. त्याचे जोरावर प्रतिवादींना त्रास देवून खर्चात टाकून व अप्रामाणिक हेतुने व मिळकत आबळस करणेच्या हेतुने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ ही सुमारे ५० वर्षे वयाची व प्रतिवादी क्र. २ ही २५ वर्षे वयाची असहाय स्त्री आहे. मुळ वादीच्या छळवणुकीमुळे प्रतिवादी हे त्रस्त आहेत. मुळ वादीकडून प्रतिवादी यांच्या जिवीतास व मिळकतीस धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादीचे दावा मिळकतीचे होणारे अपरीमित असे नुकसान होणार आहे. प्रतिवादी या अबला महिला, सहाय असून त्यांना कोणाचा आधार नाही. मूळ वादीच्या गैरकृत्यास पायबंद करणे कोर्ट हुकूमाशिवाय पर्याय नाही. वादी यांनी प्रतिवादीच्या शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा स्वत: अगर इतरामार्फत करू नये अशी तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम होणेसाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. तरी अर्ज मंजूर करण्याचा यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०६. यातील मुळ दाव्यातील वादी क्र. १ व २ तथा या प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे प्रतिवादीच्या प्रतिदाव्यास व प्रस्तुत अर्जास नि. २९ अन्वये म्हणणे दाखल केलेला आहे. वादींनी असे कथन केलेले आहे की सदरचा अर्ज हा लबाडीचा असून तो मूळ वादीस मान्य व कबूल नाही. प्रतिवादींनी या वादींना ब्लॅकमेल करून त्रास देवून हैरान केले आहे. तसेच प्रतिवादी ही महिला असल्याचा गैरफायदा घेवून वादी शितल यांचेवर कलम ३७६ अन्वये खोटी फिर्याद दाखल केली आहे. तसेच वादींना त्रास देवून त्याचेवर दबाव टाकून पिता प्रेमापोटी वादी दर्शन यांनी प्रतिवादीना दावा मिळकत १ व २ तसेच प्रतिदावा मिळकत अ व ब कायमची देवून टाकावी या हेतुने खोटा प्रतिदावा केला आहे. सदरच्या प्रतिदाव्यास कोणतेही कारण कधीही घडलेले नव्हते व नाही. सदर प्रतिदाव्यातील मिळकतीचे वर्णन अपुरे व चुकीचे आहे व दाव्यास आवश्यक पक्षकारांची बाधा येत आहे. प्रतिदावा दाखल करण्याची प्रतिवादींना लोकस स्टॅडी नव्हती व नाही. तसेच हा प्रतिदावा करण्याचा या प्रतिवादींना मुळीच कायदेशीर व नैतीक अधिकार नव्हता व नाही. प्रतिदावा हा लबाडीचा व खोटा असा आहे, सदर प्रतिदावा या वादींना मुळीच मान्य व कबुल नाही. सदरचा प्रतिदावा व ताकीद अर्ज हा फेटाळणेत यावा अशी मुळ वादीने विनंती केलेली आहे.

०७. वादी व प्रतिवादी यांच्या कथनाच्या अनुषंगाने माझे विचारार्थ अर्जाच्या निर्णयाकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष हे यानंतर नमूद केलेल्या कारणमिमांसेला अनुसरून पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ. क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध केले आहे काय ? | **होय** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने आहे काय ? | **होय** |
| ३. | अंतरिम मनाईहुकुम मिळाला नाही तर त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादीने सिद्ध केले आहे काय ? | **होय** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अर्ज अंशता: मंजुर करण्यात येतो.** |

## :कारणमिमांसा:

०८. दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याच्या कामी दाखल असलेल्या कागदपत्रांची पाहणी केली.

**वाद प्रश्न क्र. १ ते ३ करीता –**

०९. सदरचे मुद्दे एकमेकांचे निगडीत असलयाने त्याची चर्चा एकत्रितपणे करण्यात येत आहे.

१०. प्रतिवादींनी प्रस्तुतचा दावा वादींविरूध्द निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातून प्रतिवादीं कोणती मागणी केलेली आहे हे देखील पाहणे गरजेचे आहे. या प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो यातील मूळ वादी यांनी प्रतिदावा कलम १ मधील मिळकतीमधील प्रतिवादी यांचे असणारे शांततापुर्ण कबजे वहिवाटीस हरकत होईल, अडथळा होईल, नुकसान होईल, मालकी हक्कास बाधा येईल, दावा मिळकतीत घुसखोरी केली जाईल, बेकायदा कब्जा घेतला जाईल अशी कोणतीही कृत्ये स्वत: अगर इतरामार्फत करू नये अथवा करवू नये मुळ वादी यांचे विरूध्द ताकीद देवविणत यावी अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

११. प्रतिवादीचे विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादातून असे कळविले आहे की, वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ यांचे पती पत्नी सारखे नाते संबंध निर्माण झाले. मात्र दावा कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकतीवर प्रतिवादीने तिचे माहेरच्या पैसेतून स्वत:चे बांधकाम केलेले आहे. तर दावा मिळकत २ मधील सदनीका ही देखील तिने स्वत:च्या कमाईतून खरेदी केलेली आहे. त्यामुळे या दोन्ही मिळकती प्रतिवादीच्या मालकी वहिवाटीच्या आहेत. अलिकडच्या काळात वादीचे वागणे बदललेले असून ते दोन्ही मिळकती आबळस करण्याच्या प्रयत्नात आहे. या प्रयत्नात वादी यशस्वी झाल्यास प्रतिवादीला तिच्या मालकी वहिवाटीच्या दावा मिळकतीतून तो बेदखल करेल. असे झाल्यास प्रतिवादींना त्यांच्या मालकीच्या मिळकतींना मुकावे लागणार आहे व त्यांचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली.

१२. वादीचे विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादातून असे कळवितले आहे की, दावा कलम १ मधील मिळकती ही वादीचे मालकी वहिवाटीची असून दावा कलम २ मधील मिळकत वादीने प्रतिवादींच्या नावे परत खरेदी करून देण्याच्या बोलीवर खरेदी केलेली आहे. आजही प्रतिवादी ही सदर फॅलट मध्ये राहत आहे. दावा कलम १ मधील मिळकतीत असलेले प्रतिवादीचे ताब्या व्यतिरिक्त असलेल्या ५ सदनीकीचे भाडे सन २०२० पर्यंत वादीने जावून येवून गोळा करीत होते. मात्र २०२० च्या सुमारास करोना काळात वादीचा अपघात झाला व तो काही दिवस कोमातही होता. सदर अपघातामुळे वादीस अर्धांगवायु झालेले असून वादीस इतरही व्यादी आहे. अशात वादी क्र. १ ने दावा मिळकत क्र. १ ही वादी क्र. २ यास वाटून दिलेली आहे. त्यामुळे सदरची मिळकत ही वादी दर्शन याचे वापर व उपभोगत आहे व तोच सदर मिळकतीमध्ये भाडेकरी ठेवून उत्पन्न घेत आहे. दरम्यान आर्थिक तंगीमुळे

वादी सदरची इमारत विकण्याच्या तयारीत होते. सदरची बाब वादी यांनी दि. १४.१०.२०२३ रोजी प्रतिवादीस सांगितली असता प्रतिवादी यांनी त्यांना अरवाच्य भाषेमध्ये शिवीगाळ केली. अशातच प्रतिवादीने वादीविरूध्द गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादीच्या सदर कृत्यामुळे वादीना सदर मिळकतीमध्ये जाण्यास पोलीसांनी बंदी घातलेली आहे. त्यामुळे वादींना सदर मिळकतीमध्ये जावून भाडेकरू यांचेकडून भाडे गोळा करणे अवघड झालेले आहे. प्रतिवादीच्या अशा वागण्यामुळे वादीने प्रतिवादीस मॅनेजर पदावरून तत्काळ काढण्याचा निर्णय घेतला तसेच सदर मिळकतीचे फिरवून खरेदीखत करण्याची मागणी नोटीस द्वारे केली. मात्र ती नोटीस प्रतिवादीनी न सोडवल्यामुळे परत आली आहे. अशा वेळी प्रतिवादाच्या लाभात कोणताही मनाई आदेश झाल्यास वादीला दावा मिळकतीवरील त्यांच्या शांततामय कब्जे वहिवाटीला बाधा येणार आहे तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

१३. दावा मिळकतीवर वादींचाच कब्जा आहे हे दाखवण्यासाठी वादी तर्फे या कामी निशाणी ४७ सोबत वादीने दावा नं १ या मिळकतीच्या सात बारा उतारा दाखल केला आहे. तर निशाणी ४७/३ वर २१३६३ हा फेरफार उतारा दाखल केलेला आहे. दावा मिळकत १ ही वादी क्र २ च्या नावे असल्याचे दिसून येते. तसेच वादीने निशाणी ४९ वर वादी यांनी भाडेकरू यांच्याकडून लिहून घेतलेले ११ महिने कालावधीचे भाडेकरार दाखल केलेले आहे. यावरून सर्वे नं ८४/६क या मिळकती मध्ये उभे असलेले इमारतीतील ५ सदनीका याच्याशी संबंधीत भाडेकरार हे वादीनी लिहून घेवून भाडयाची रक्कम देखील स्वीकारली आहे असे दिसते. याउलट सदर ६ सदनीकेवर प्रतिवादी ची वहिवाट हे दाखवणार कोणताही दस्तखत प्रतिवादींनी दाखल केलेला नाही. मात्र वादींनी स्वता: ही बाब मान्य केलेली आहे की सदर

इमारती मधील १ सदनीका ही प्रतिवादींच्या ताब्यात आहे. दावा मिळकत २ म्हणजेच सदनीका क्र ३०१ ही घर मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात असल्याची बाब वादींनी नाकारलेली आहे. असे असले तरी आपल्या वादकथनातून वादींनी स्वता: कबूल केलेले आहे की सदर सदनीकेचे खरेदी खत हे पोकळीस्त स्वरूपात प्रतिवादीचे नावे करून दिलेले आहे. याचाच अर्थे सदनीका क्र ३०१ या मिळकतीवर प्रतिवादी क्र १ चे नाव मालक म्हणून दाखल आहे. सदन मिळकतीवर दोन्ही पक्षकारांनी आपला ताबा असल्याचा दावा केलेला आहे. सदरची मिळकती प्रतिवादीच्या नावे आहे. तर सदर मिळकतीचा दावा आहे हे दाखवणारा कोणताही दस्त वादीनी या कामी दाखल केलेला नाही. ही बाब खरी आहे की दावा मिळकत २ मध्ये निश्वती कोणाचा दावा आहे दोन्ही पक्षकार तर्फे दाखल होणा–या पुराव्या वरून होणार आहे. परंतु प्रतिवादी क्र १ वादी क्र १ विरूध्द गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केलेला आहे. वादीने स्वता: पोलिसांनी त्याला प्रतिवादीचे दावा मिळकतीवरील वहिवाटीस हरकत अडथळा करू नये अशी ताकीद दिलेली आहे. त्यामुळे दावा मिळकत १ मधील वादीच्या ताब्यात असलेली सदनीका व दावा मिळकत २ मध्ये ही प्रतिवादीच्या नावे असलेल्या मिळकती मधील तिचे ताबे वहिवाटीस वादीने हरकत अडथळा करू नये असा आदेश पारित झाल्यास कोणत्याही पक्षकारांचे अपरिमित नुकसान होणार नाही. यांचे कारण म्हणजे निशाणी ५ वरील आदेशा मध्ये असे निश्चित करण्यात आलेले आहे की दावा कलम १ मधील प्रतिवादी क्र १ च्या ताब्यातील सदनेके व्यतिरिक्त उरर्वत ५ सदनीके मध्ये ताबा आहे असे सकृतदर्शनी साबित झालेले आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या मधील संबंध अजून बिघडू नये म्हणू प्रतिवादींची वरील नमूद मिळकती वरील ताब्यास वादींनी हरकत अडथळा करू नये असे आदेश झाल्यास न्यायाचे होईल. तरी मी वरील चर्चेच्या आधारे मुददा

क्र १ ते ३ चे उत्तर होकाअर्थी देत असून मुददा क्र ४ चे उत्तर देण्यासाठी पुढील प्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना असा आदेश देण्यात येत आहे की, प्रतिदाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो त्यांनी प्रतिदावा कलम १ अ मधील वादींच्या ताब्यातील १ सदनीका व प्रतिदावा कलम ब मध्ये नमूद केलेला फलॅट नं. ३०१ या वरील प्रतिदाव्यातील वादी यांचे असणारे शांतापूर्ण कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा होईल असे कोणतेही कृत्य स्वत: अथवा इतरामार्फत करू नये.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

SARIKA SANDEEP PAKHALE
Digitally signed by SARIKA SANDEEP PAKHALE
Date: 2025.12.15 16:39:32 +0530

स्थळ : पंढरपूर.
दि. २६.११.२०२५.

(श्रीमती एस. एस. पाखले)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A. I. Khan (Steno G-II). |
| Court | - | Civil Judge, Senior Division, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 26.11.2025. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 15.12.2025. |
| Judgment/Order uploaded on | - | 15.12.2025. |